# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/02/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. मौदा :- अंतर्गत सावरगाव ते बाबदेव रोड कॅनल येथे दिनांक २५/०२/२०२३ चे २०.३० वा. ते दिनांक २६/०२/२०२३ चे ०७.००० वा. दरम्यान हिरो पॅशन प्रो. मोटरसायकल क्र. एम. एच-४०-ए. डब्ल्यु-१४४१ चा चालक व **मृतक नामे- सुनील मधुकर शेंद्रे, वय ३२ वर्ष, रा. नानादेवी ता. मौदा** हा नमुद घटना वेळी सावरगाव येथुन आपल्या गावी स्वत: मोटरसायकलने परत येत असता सावरगाव बाबदेव रोड कॅनल बाबदेव शिवार येथील कॅनल जवळ मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन कॅनलचे पुलावरील भिंतीला आदळुन मोटरसायकलसह कॅनलमध्ये पडुन गंभीर जखमी होऊन स्वत:चे मृत्युस कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस उपनिरीक्षक जगदीश बिरोले पोस्टे मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जगदीश बिरोले पोस्टे मौदा मो. नं. ९४०३७०१२६३ हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. काटोल :- अंतर्गत ग्रामिण रूग्णालय काटोल येथे दिनांक २५/०२/२०२३ चे ०७.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे- हेमंत रामदासजी पर्बत, वय ४३ वर्ष, रा. धंतोली काटोल यांचे वडील व **मृतक नामे- रामदास गोंविदारवजी पर्बत, वय ८३ वर्षे, रा. धंतोली काटोल** यांना पॅरॅलीसेस व बीपीचे आजार असल्याने आजाराला कंटाळुन सिलीग फॅनला धोतर बांधुन गळफास लावुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार पवन पोस्टे काटोल ब. नं. ५०० मो. नं. ९८३४२८१४०१ हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत मेडीकल कॉलेज नागपुर येथे दिनांक २३/०२/२०२३ चे १५.०० वा. सुमारास यातील **मृतक महीला नामे– कांता हरीराम खडसे, वय ४५ वर्षे, रा. पारडसिंगा ता. काटोल** हीने दि. २०/०२/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वा. ते ०८.१५ वा. दरम्यान आपले राहते घरी घरगुती टेंशनमुळे अंगावर स्वत: मातीचे तेल टाकुन जाळुन घेतल्याने तिच्या शरीराचा ९५ टक्के भाग जळाल्याने प्रथम उपचार करीता ग्रामिण रूग्णालय काटोल येथे नेले असता नंतर नागपुर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भर्ती केले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस हवालदार राजेश माकडे ब. नं. ५७२ मेडीकल पोलीस बुथ ना. ग्रा. यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नायक आशिष हिरूडकर ब. नं. ९०० मो. नं ९३५९३९११८६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर